# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती

***************************************************

क्र.प्र.अ./भू.स/अ.का./कावि - ८४२/१९ दिनांक : 23/१२/ २०१९

***************************************************

## "कलम - ११"

## अधिसूचना

### (भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

भूसंपादन प्र.क्र. ४/४७/२०१८-१९ **मौजा सोनगांव, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती** ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे, असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनूसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांस या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **"उक्त जमीन"** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापूढे ज्याचा निर्देश उक्त **"सार्वजनिक प्रयोजन"** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे ; आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमिसंपादनच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचिमध्ये कारणे नमुद करावीत);

आणि ज्याअर्थी, सामाजीक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, या सोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचिमध्ये तपशिल नमुद करावा);

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू,उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतू, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लघंन केल्यामूळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापूढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.२, अमरावती यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

जमीनीचे वर्णन

गांव **सोनगांव** तालुका **चांदूर रेल्वे** जिल्हा अमरावती

| अ. क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २५९ पै | ०.४० |
| **एकूण क्षेत्र ०.४० हे.आर.** | | |

## अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपाबाबत विवरण :- **सोनगांव शिवणी बृहत ल.पा. प्रकल्पाचे कामाकरीता**

प्रकल्पाचे नांव :- **सोनगांव शिवणी बृहत ल.पा. प्रकल्पाचे कामाकरीता**

प्रकल्प कार्याचे वर्णन :- **सोनगांव शिवणी बृहत ल.पा. प्रकल्पाचे कामाकरीता**

सामाजिक मिळणारे लाभ :- सोनगांव शिवणी बृहत ल.पा. प्रकल्पाचे निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी, पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धानामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मीती ईत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांच्या आर्थीक स्थितीत सुधारणा होणार आहे.

## अनुसूची तीन

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

गांव **सोनगाव** तालुका **चांदूर रेल्वे** जिल्हा अमरावती

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| विस्थापन होत नसल्याने पुनर्वसाहतीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक | | |

## अनुसूची चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश)

सदर प्रकरणी घरे/कुटुंबे बाधीत होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुर्नस्थापनेची आवश्यकता नाही.)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)

## सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसुल व वन विभाग मुंबई, दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसुचना अन्वये सुट देण्यात आली आहे.

## अनुसूची पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-

| | | |
|---|---|---|
| (अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | :- | प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही |
| (ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | निरंक |
| (क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल | :- | निरंक |

**टिप -** उक्त जमीनीच्या आराखडयाचे भूसंपादन अधिकारी अ.व.प्र.क्र.२ अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :-** २३ /१२/ २०१९

**ठिकाण :-** अमरावती

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
अ.व.प्र. लाभक्षेत्र क्र.२ अमरावती

(संजय पवार)
जिल्हाधिकारी, अमरावती